# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

## दि.०५/१०/२०११ रोजी झालेल्या मंडळाच्या २७२ व्या बैठकीचे ठराव

नुकतेच सेवानिवृत्त झालेले श्री.विनोद पितळे , उपमुख्य अभियंता यांनी म्हाडाच्या अमरावती मंडळ , नाशिक मंडळ अशा विभागीय मंडळात काम केले आहे.तसेच मुंबई मंडळात घाटकोपर विभाग ,उपमुख्य अभियंता ( स्थापत्य ) आणि सहमुख्य अधिकारी या पदावर केलेल्या कामाचे आभार मानन्यात आले.मुंबई मंडळामार्फत श्री.विनोद पितळे, उपमुख्य अभियंता (सेवानिवृत्त) यांना सेवानिवृत्तीनंतरच्या कालावधीसाठी शुभेच्छा देण्याबाबत कळविण्याचे ठरले.

**ठराव क्र. २७२ /२९९६** **दि.०५.१०.२०११**

श्री.विनोद पितळे, उपमुख्य अभियंता ( स्थापत्य ) दि.३०.०९.२०११ रोजी म्हाडाच्या सेवेतून निवृत्त झाले. श्री.विनोद पितळे यांनी म्हाडाच्या अमरावती मंडळ , औरंगाबाद मंडळ आणि नाशिक मंडळ काम केले आहे.मुंबई मंडळात घाटकोपर विभाग, उपमुख्य अभियंता ( स्थापत्य ) सहमुख्य अधिकारी या पदावर काम करताना मुंबई मंडळास मोलाचे मार्गदर्शन केले व सहकार्य केले.मुंबई मंडळ त्यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद देते.आणि त्यांच्या सेवानिवृत्तनंतरचे आयुष्य सुखाचे ,समाधानाचे ,निरोगी आणि दिर्घायु लाभो अशा शुभेच्छा देते.मंडळामार्फत श्री.विनोद पितळे,उपमुख्य अभियंता यांना मंडळाच्या भावना कळविण्यात याव्यात.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्र. २७२/०१ :- दि. १४/०९/२०११ रोजी झालेल्या मुंबई मंडळाच्या २७१ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.**

मुंबई मंडळाच्या दि.१४/०९/२०११ रोजीच्या २७१ व्या बैठकीचे कार्यवृत्त सभागृहाने एकमताने स्थायी केले.

**बाब क्र. २७२/०२ :- डी.एन.नगर अंधेरी (प) या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र.८ अे, ८बी ज्योती सहकारी गृहनिर्माण विकास संस्था मर्यादित न.भू.क्र.१९५ [पै] अंधेरी (प) या इमारतीच्या पुनर्विकासाकरीता सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार म्हाडाकडून ''ना-हरकत प्रमाणपत्र'' प्राप्त करणेसाठी सादर झालेला प्रस्ताव.**

**ठराव क्र. २७२/२९९७** **दि. ०५/१०/२०११.**

डी.एन.नगर अंधेरी (प) या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र.८ अे, ८बी ज्योती सहकारी गृहनिर्माण विकास संस्था मर्यादित न.भू.क्र.१९५ [पै] अंधेरी (प) या संस्थेने विनंती केल्यानुसार

संस्थेची इमारत न.भू.क्र. १९५ वर आहे. सन २००९ च्या रेडिरेकनर दरसूचित न.भू.क्र. १९५ हा पूर्णतः मूल्यदर विभाग क्र. ३९/१९८ ए मध्ये दाखविण्यात आला असून विकसित भूखंडाचा दर रुपये ५७,०००/- प्र.चौ.मी. असा होता. इमारतीखालील जमीन न.भू.क्र. १९५ वर असली तरी ती मूल्यदर विभाग क्र. ३९/१९८ असल्याने संस्थेस वितरीत करण्यात आलेले क्षेत्रफळासाठी मूल्यदर विभाग क्र. ३९/१९८ प्रमाणे रुपये ४२,०००/- प्र.चौ.मी.दराने सुधारित देकारपत्र देताना उपनिबंधक यांचे दि.०१/०१/२०१० रोजीच्या पत्राची खातरजमा करुन खातरजमा करुन सुधारित देकारपत्र देण्यास मुंबई मंडळ मंजूरी देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्र.२७२/०३ :- इमारत क्र.७ ते १८ वरळी शिवशाही सह गृहनिर्माण संस्था मर्या. शिवाजी नगर, वरळी या १२ इमारतींच्या पुर्नबांधणीकरीता विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत १.५९६ चटई क्षेत्र निर्देशांकाच्याप्रमाणे पुनर्विकासास ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

**ठराव क्र. २७२/२९९८** **दि. ०५/१०/२०११.**

इमारत क्र.७ ते १८ वरळी शिवशाही सह गृहनिर्माण संस्था मर्या. शिवाजी नगर, वरळी या संस्थेच्या पुनर्विकासाच्या ठरावास मुंबई मंडळाने ठराव क्र.२६६/२९४६, दि.२०/०५/२०११ अन्वये मंजूरी दिली आहे. सदरहू ठरावातील मुद्दा क्र.३ नुसार उर्वरित चटई क्षेत्रफळ १०२२.८० चौ.मी. करीता म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडिरेकनर दर २०११ नुसार प्राप्त होणारी रक्कम अधिमूल्याच्या रक्कमे एवढी अनामत रक्कम किंवा राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी स्वरुपात स्वीकारण्यात यावी. संस्थेच्या भूखंडावरील सी.आर.झेड.२ चे आरक्षण रद्द झाल्यानंतर संस्थेने सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत प्रस्ताव सादर केल्यास २-सी (i) आणि २-सी (ii) अंतर्गत प्रस्तावाची छाणनी करुन म्हाडाच्या हिताचा प्रस्ताव स्वीकारण्याचा अधिकार राखून मुंबई मंडळ संस्थेस देकारपत्र व ना-हरकत प्रमाणपत्र जारी करण्यास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्र.२७२/०४ :- इमारत क्र.५ शिव प्रेरणा सह गृहनिर्माण संस्था मर्या. शिवाजी नगर, वरळी या १२ इमारतींच्या पुर्नबांधणीकरीता विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत १.५९६ चटई क्षेत्र निर्देशांकाच्याप्रमाणे पुर्नविकासास ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

**ठराव क्र.२७२/ २९९९** **दि. ०५/१०/२०११.**

इमारत क्र.५ शिव प्रेरणा सह गृहनिर्माण संस्था मर्या. शिवाजी नगर, वरळी या संस्थेच्या पुनर्विकासाच्या ठरावास मुंबई मंडळाने ठराव क्र. २६६/२९४५, दि.२०/०५/२०११ अन्वये मंजूरी दिली आहे. सदरहू ठरावातील मुद्दा क्र.३ नुसार उर्वरित चटई क्षेत्रफळ ६६१.३५ चौ.मी. करीता म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडिरेकनर दर २०११ नुसार प्राप्त होणारी रक्कम अधिमूल्याच्या रक्कमे एवढी अनामत रक्कम किंवा राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी स्वरुपात स्वीकारण्यात यावी. संस्थेच्या भूखंडावरील सी.आर.झेड.२ चे आरक्षण रद्द झाल्यानंतर संस्थेने सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत प्रस्ताव सादर केल्यास २-सी (i) आणि २-सी (ii) अंतर्गत

प्रस्तावाची छाननी करुन म्हाडाच्या हिताचा प्रस्ताव स्वीकारण्याचा अधिकार राखून मुंबई मंडळ संस्थेस देकारपत्र व ना-हरकत प्रमाणपत्र जारी करण्यास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

आयत्या वेळच्या पुढील बाबी चर्चेकरीता घेण्यात आल्या.

**बाब क्र.२७२/०५ :- शास्त्री नगर, गोरेगांव (पश्चिम) या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र. ७, शास्ती नगर द्वारका सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., न.भू.क्र.२१९ (पार्ट), मौजे-पहाडी गोरेगांव च्या पुनर्विकासाकरीता सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेला प्रस्ताव.**

**ठराव क्र.२७२/३०००** **दिनांक : ०५/१०/२०११**

**शास्त्री नगर, गोरेगांव (पश्चिम) या म्हाडा वसाहतीतील इमारती क्र. ७, शास्त्री नगर द्वारका सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,** या संस्थेने सुधारित विकास नियत्रंण नियमावली ३३ (५) २ (ii) अंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावा नुसार खालील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१. संस्थेच्या १३८३.३५ चौ.मी. पोटविभाजित भूखंडावर सुधारित विकास नियत्रंण नियमावली ३३ (५) नुसार २.५ च.क्षे.नि.पर्यंत बांधकाम क्षेत्रफळ वापर करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.
२. संस्थेच्या १३८३.३५ चौ.मी. पोटविभाजित भूखंडावर सुधारित विकास नियत्रंण नियमावली ३३ (५) नुसार २.५ च.क्षे.नि. प्रमाणे एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रफळ ५४५८.३७ चौ.मी. असून संस्थेस दि.२५/०५/२००५ रोजीच्या पत्रान्वये अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ १०७३.२० चौ.मी. + अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ ५२५.९३ चौ.मी. (१७७.३९ चौ.मी. रहिवासी वापर + ३४८.५४ चौ.मी. वाणिज्य वापर) आणि दि.१२/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ १५७७.८८ चौ.मी. रहिवासी वापराकरीता असे एकूण ३१७६.९३ चौ.मी. वजा करता उर्वरित २८१.४४ चौ.मी. वितरीत करता येते.

संस्थेच्या उर्वरित २८१.४४ चौमी बांधकाम क्षेत्रफळापैकी सुधारित विकास नियत्रंण नियमावली ३३ (५) २ (i) नुसार व प्राधिकरण ठराव क्र.६५०७ दि.२०/०९/२०१० व मुंबई मंडळाने प्रस्तावित केलेल्या सुधारणास प्राधिकरणाच्या मान्यतेच्या अधिन राहून  म्हाडास मिळणारे १३९.८४ चौमी बांधकाम क्षेत्रफळ घेण्यास मंजूरी खालील अटी व शर्तीनुसार देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

अ) सदर प्रकरणी सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत इमारत प्रस्ताव विभागातर्फे आवश्यक त्या सर्व मंजूऱ्या प्राप्त करण्याची जबाबदारी विषयांकीत संस्था, विकासक आणि संस्थेच्या वास्तुशास्त्रज्ञावर राहील.

ब) विषयांकीत संस्थेने प्रस्तावासोबत सादर न केलेल्या कागदपत्रांपैकी मिळकत व्यवस्थापक यांचे ना देय प्रमाणपत्र ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यापुर्वी आणि नगर भूमीपन नकाशे व मिळकत पत्रिका मुंबई महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्रासाठी मंडळाचे संमती पत्र प्राप्त करण्यापूर्वी सादर करणे बंधनकारक आहे.

क) सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) मधील नियम (५) अन्वये संस्थेने मुंबई पालिकेच्या संबंधीत इमारत प्रस्ताव विभागाकडे अतिरिक्त चटईक्षेत्रफळाच्या अधिमूल्याच्या १२.५ टक्के इतकी (रु.६०९५५२.००/-) रक्कम ऑफसाईट इन्फ्रास्ट्रक्चर फी मुंबई मंडळाच्या ना हरकत प्रमाणपत्रापूर्वी भरणा करणे आवश्यक राहील.

ड) संस्थेस पूर्वी जारी करण्यात आलेले वसुली पत्रामध्ये एकूण रक्कम रु.७०,११,६१०/- एवढी कळविलेली आहे. पत्रामध्ये दिलेली मुदत संपलेली असून वसूली पत्रातील रक्कम व त्यावर विलंब झालेल्या कालावधीचे व्याजाचे रक्क्म आणि भविष्यात जारी करण्यात येणारे देकारपत्रातील रक्कम संस्थेने भरणा केल्यानंतरच ना हरकत प्रमाणपत्र चे वितरण करण्यात येईल.

ई) भविष्यात सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अन्वये संस्थेस प्राप्त होणारे समप्रमाणात प्रति गाळा अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ संस्था वापर करु शकणार नाही.

फ) प्राधिकरण ठराव क्रमांक ६३९७ अन्वये गठीत केलेल्या समितीच्या दि.०३/१०/२००९ रोजीच्या बैठकीत निश्चित केलेल्या टीडीआर दर + ०५ टक्के रेडीरेकनर दर आणि इडब्ल्यूएस तसेच अल्प उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दर ४० टक्के तसेच मध्यम उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दर ६० टक्के यामधील तुलनेत जो दर कमी असेल तो दर दि.०१/०७/२०११ नंतर च्या प्रस्तावास लागू राहील.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे. संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर, ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

सदरहु बैठकीचे कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता मुंबई मंडळ मंजूर ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्यास प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्र.२७२/०६ :- आझाद नगर, अंधेरी (प) या म्हाडा वसाहतीतील इमारत क्रमांक ५, केदार दर्शन को.ऑप.हौ.सो.लि., न.भू.क्र. ८०९ (पै) मौजे-अंधेरी च्या पुनर्विकासाकरीता सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेला प्रस्ताव.**

**ठराव क्र. २७२/३००१** **दिनांक :- ०५/१०/२०११**

**आझाद नगर, अंधेरी (प) या म्हाडा वसाहतीतील इमारत क्रमांक ५, केदार दर्शन को.ऑप.हौ.सो.लि.,** संस्थेने मागणी केल्यानुसार,

१. आझाद नगर, अंधेरी (प) या वसाहतीचा सुधारीत अभिन्यास सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार मंजूर होण्यापूर्वी भाडेपट्टा करारनाम्यानुसार ४६८.७४ चौ.मी.+ फूटकळ भूखंड ३२९.५८ चौ.मी.+ स्किम ओपन स्पेस २७.४४ चौ.मी. + अंतरिक रस्ता + १९२.०० चौ.मी. अशा एकूण १०१७.७६ चौ.मी.भूखंडापैकी स्किम ओपन स्पेस व अंतरिक रस्त्याखालील क्षेत्र वगळता पोटविभाजीत ७९८.३२ चौ.मी. भूखंडावर शासन निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापर करुन, विकास करण्यास मुंबई मंडळ मंजूरी देत आहे.

२.	संस्थेच्या एकूण पोटविभाजीत भूखंड ७९८.३२ चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक १९९५.८० चौ.मी.आहे. यामधून संस्थेचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ ६१२.८० चौ.मी. वजा केल्यास उर्वरित १३८३.०० चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते.

प्राधिकरण ठराव क्र. ६३९७ नुसार दि.०१/०७/२०११ नंतर कालावधीसाठी टी.डी.आर. चे दर अद्याप निश्चित केलेले नाहीत. प्राधिकरण ठराव क्र. ६३९७ अन्वये गठीत समिती टी.डी.आर. बाबत निश्चित होणारे दर व प्राधिकरण ठराव क्र. ६२६० आणी ६४२२ अन्वये २०११ च्या रेडीरेकनर दराच्या ४०% दराने म्हणजेच (रु.७२,९०० च्या ४०% म्हणजेच रु.२९,१६०/- प्रती चौ.मी.) अन्वये २०११ च्या रेडीरेकनरनुसार होणारे दर यापैकी कमी असेल त्या दराने उर्वरित १३८३.०० चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ रहिवासी वापरासाठी वितरीत करण्यासाठी वसाहतीचा सुधारित अभिन्यास मुंबई महानगरपालिकेच्या मान्यतेच्या आधीन राहून खालील अटी व शर्तीवर देण्यास मुंबई मंडळ मंजूरी देत आहे.

**अटी व शर्ती :-**

अ. सदर प्रकरणी सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत इमारत प्रस्ताव विभागातर्फे आवश्यक त्या सर्व मंजू-या प्राप्त करण्याची जबाबदारी विषयांकित संस्था, विकासक आणि संस्थेच्या वास्तुशास्त्रज्ञावर राहिल.

ब. विषयांकित संस्थेने प्रस्तावासोबत सादर न केलेले कागदपत्र ना हरकत प्रमाणपत्रापुर्वी सादर करणे आवश्यक राहील.

क. सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) मधील नियम (५) अन्वये मुंबई पालिकेच्या संबंधित इमारत प्रस्ताव विभागाकडे अति चटई क्षेत्रफळाच्या अधिमुल्याच्या १२.५ टक्के इतकी (रु.५०४१०३५.००/-) रक्कम ऑफसाईट इन्फ्रास्ट्रक्चर फी मुंबई मंडळाच्या ना हरकत प्रमाणपत्रापुर्वी भरणा करणे आवश्यक राहिल.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर, ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्र.२७२/०७ :- डी.एन.नगर, अंधेरी (प) या म्हाडा वसाहतीतील श्री.एम.एम.खिवसारे यांना वितरीत केलेली कार्यालयीन ९/१ न.भू.क्र.१९५ (पै) मौजे-अंधेरी च्या पुनर्विकासाकरीता सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेला प्रस्ताव.**

**ठराव क्र. २७२/३००२** **दिनांक :- ३०/१२/२०१०**

**डी.एन.नगर, अंधेरी (प) या म्हाडा वसाहतीतील श्री.एम.एम.खिवसारे यांना वितरीत केलेली कार्यालयीन ९/१ न.भू.क्र. १९५ (पै) मौजे-अंधेरी यांनी** मागणी केल्यानुसार,

१. डी.एन.नगर, अंधेरी (प) या वसाहतीचा सुधारीत अभिन्यास सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार मंजूर होण्यापूर्वी श्री.एम.एम.खिवसारे यांना वितरीत केलेली कार्यालयीन ९/१ न.भू.क्र. १९५ (पै) मौजे-अंधेरी (प) च्या पोटविभाजीत ३०४.४१ चौ.मी. भूखंडावर शासन निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापर करुन, विकास करण्यास मुंबई मंडळ मंजूरी देत आहे.

२. श्री.एम.एम.खिवसारे यांना वितरीत केलेली कार्यालयीन ९/१ न.भू.क्र. १९५ (पै) मौजे-अंधेरी (प) च्या एकूण पोटविभाजीत भूखंड ३०४.४१ चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक ७६१.०३ चौ.मी.आहे. यामधून संस्थेचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ ३०४.४१ चौ.मी. वजा केल्यास उर्वरित ४५६.६२ चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते.

प्राधिकरण ठराव क्र. ६३९७ नुसार दि.०१/०७/२०११ नंतर कालावधीसाठी टी.डी.आर. चे दर अद्याप निश्चित केलेले नाहीत. प्राधिकरण ठराव क्र. ६३९७ अन्वये गठीत समिती टी.डी.आर. बाबत निश्चित होणारे दर व प्राधिकरण ठराव क्र. ६२६०

आणी ६४२२ अन्वये २०११ च्या रेडीरेकनर दराच्या ६०% दराने म्हणजेच (रु.५२.३०० च्या ६०% म्हणजेच रु.३१,३८०/- प्रती चौ.मी.) अन्वये २०११ च्या रेडीरेकनरनुसार होणारे दर यापैकी कमी असेल त्या दराने उर्वरित ४५६.६२ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ रहिवासी वापरासाठी वितरीत करण्यासाठी वसाहतीचा सुधारित अभिन्यास मुंबई महानगरपालिकेच्या मान्यतेच्या आधीन राहून खालील अटी व शर्तींवर देण्यास मुंबई मंडळ मंजूरी देत आहे.

**अटी व शर्ती :-**

अ. सदर प्रकरणी सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत इमारत प्रस्ताव विभागातर्फे आवश्यक त्या सर्व मंजू-या प्राप्त करण्याची जबाबदारी विषयांकित संस्था, विकासक आणि संस्थेच्या वास्तुशास्त्रज्ञावर राहिल.

ब. सुधारित वि.नि.नि. ३३(५) अन्वये संस्थेने मुंबई पालिकेच्या संबंधित इमारत प्रस्ताव विभागाकडे अति.चटईक्षेत्रफळाच्या अधिमुल्याच्या १२.५ टक्के इतकी (रु.१७,९१,०९१.९५/-) रक्कम ऑफसाईट इन्फ्रास्ट्रक्चर फी मुंबई मंडळाच्या ना हरकत प्रमाणपत्रापुर्वी भरणा करणे आवश्यक राहील

क. मुंबई मंडळाने कार्यालयीन इमारतीच्या पुनर्विकासाकरीता अतिरिक्त चटईक्षेत्रफळाच्या वितरणाबाबत पारित केलेल्या ठराव क्र.२६९/२९८३, दि.०५/०८/२०११ च्या अनुषंगाने प्राधिकरण जो निर्णय घेईल तो सदरहू प्रस्तावास बंधनकारक असेल.

ड. संस्थेस देकार पत्र देण्यापूर्वी इमारतीचा भूखंड सीआरझेड ने बाधित होतो किंवा कसे याची खातरजमा करण्यात यावी.

ई. प्राधिकरण ठराव क्र.६३९७ नुसार दि.०१/०७/२०११ नंतर टि.डी.आर. चे दर निश्चित करण्यात आलेले नाहीत. याबाबत समिती गठीत करण्यात आली असून, सदर समिती जो टि.डी.आर. दर निश्चित करेल तो दर व रेडीरेकनर दर यापैकी जे दर कमी असेल त्या दर करुन सदरहू प्रस्तावास लागू राहिल.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर, ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्र.२७२/०८ :- कार्यालयीन इमारत क्र. ३, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय खेरनगर, वांद्रे (पू) मुंबई च्या पुनर्विकासाकरीता सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेला प्रस्ताव.**

**ठराव क्र. २७२/३००३ दिनांक :- ०५/१०/२०११**

**कार्यालयीन इमारत क्र. ३, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय खेरनगर, वांद्रे (पू) मुंबई** या संस्थेने मागणी केल्यानुसार,

१. **कार्यालयीन इमारत क्र. ३, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय खेरनगर, वांद्रे (पू) मुंबई** या वसाहतीचा सुधारीत अभिन्यास सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार मंजूर होण्यापूर्वी पोटविभाजीत ४०१.५२ चौ.मी. भूखंडावर सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) अंतर्गत चटई क्षेत्रफळ वितरीत करण्यास मुंबई मंडळ मंजूरी देत आहे.

२. संस्थेच्या एकूण पोटविभाजीत भूखंड ४०१.५२ चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक १००३.५२ चौ.मी.आहे. यामधून संस्थेचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ व दि.०६/०९/२००९ रोजीच्या ना हरकत प्रमाणपत्रानुसार यापूर्वी वितरीत ४०१.५२ चौ.मी. वजा केल्यास उर्वरित ६०२.२८ चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते.

मुंबई मंडळाचा ठराव क्र.२६९/२९८३ दि.०५/०८/२०११ रोजीच्या ठरावास प्राधिकरणाच्या मान्यतेच्या आधिन राहून बांधिव क्षेत्रफळ मंडळास घेण्यास खालील अटी व शर्तीवर मुंबई मंडळ मंजूरी देत आहे.

**अटी व शर्ती :-**

अ. सदर प्रकरणी सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत इमारत प्रस्ताव विभागातर्फे आवश्यक त्या सर्व मंजू-या प्राप्त करण्याची जबाबदारी विषयांकित संस्था, विकासक आणि संस्थेच्या वास्तुशास्त्रज्ञावर राहिल.

ब. विषयांकित संस्थेने प्रस्तावासोबत सादर न केलेले कागदपत्रापैकी मिळकत व्यवस्थापक यांचे ना देय प्रमाणपत्र ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यापूर्वी सादर करणे बंधनकारक आहे.

क. संस्थेने सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) मधील नियम (५) अन्वये संस्थेने मुंबई पालिकेच्या संबंधित इमारत प्रस्ताव विभागाकडे अति चटई क्षेत्रफळाच्या अधिमुल्याच्या १२.५ टक्के इतकी (रु.१३,९४,२७८.२०/-) रक्कम ऑफसाईट इन्फ्रास्ट्रक्चर फी मुंबई मंडळाच्या ना हरकत प्रमाणपत्रापुर्वी भरणा करणे आवश्यक राहिल.

ड. प्राधिकरण ठराव क्रमांक ६३९७ नुसार दिनांक ०१/०७/२०११ नंतर टि.डी.आर.चे दर निश्चित करण्यात आलेले नाहीत. याबाबत समिती गठीत करण्यात आली असून, सदर समिती जो टि.डी.आर. दर निश्चित करेल तो दर व रेडीरेकनर दर यापैकी जे दर कमी असेल त्या दर करुन उपरोक्त प्रस्तावास लागू राहिल.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे. संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर, ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्र.२७२/०९ :- खेरनगर, वांद्रे (पूर्व) या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र. २९, खेरनगर गितांजली सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., न.भू.क्र. ६०१ (भाग) मौजे-वांद्रे (पूर्व), च्या पुनर्विकासाकरीता सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेला प्रस्ताव.**

**ठराव क्र. २७२/३००४** **दिनांक :- ०५/१०/२०११**

**खेरनगर, वांद्रे (पूर्व) या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र. २९, खेरनगर गितांजली सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., न.भू.क्र. ६०१ (भाग) मौजे-वांद्रे (पूर्व),** संस्थेने मागणी केल्यानुसार,

१. **खेरनगर, वांद्रे (पूर्व)** या वसाहतीचा सुधारीत अभिन्यास सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार मंजूर होण्यापूर्वी १४७९.२३ चौ.मी. अभिहस्तांतरणानुसार क्षेत्र + १३०.६१ चौ.मी. यापूर्वी वितरीत अतिरिक्त जमिन असे एकूण पोटविभाजीत १६०९.८४ चौ.मी. भूखंडावर शासन निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापर करुन, विकास करण्यास मान्यता देणे

२. संस्थेच्या एकूण पोटविभाजीत भूखंड १६०९.८४ चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक ४०२४.६० चौ.मी.आहे. यामधून संस्थेचे १६००.०० चौ.मी. अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ + २२६३.५८ चौ.मी. यापूर्वी वितरीत केलेले बांधकाम क्षेत्रफळ असे एकूण ३८६३.५८ चौ.मी. वजा केल्यास उर्वरित १६१.०२ चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते.

प्राधिकरण ठराव क्र. ६३९७ नुसार दि.०१/०७/२०११ नंतर कालावधीसाठी टी.डी.आर. चे दर अद्याप निश्चित केलेले नाहीत. प्राधिकरण ठराव क्र. ६३९७ अन्वये गठीत समिती टी.डी.आर. बाबत निश्चित होणारे दर व प्राधिकरण ठराव क्र. ६२६० आणी ६४२२ अन्वये २०११ च्या रेडीरेकनर दराच्या ४०% दराने म्हणजेच (रु.४६,३०० च्या ४०% म्हणजेच रु.१८,५२०/- प्रती चौ.मी.) अन्वये २०११ च्या रेडीरेकनरनुसार होणारे दर यापैकी कमी असेल त्या दराने उर्वरित १६१.०२ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ रहिवासी वापरासाठी वितरीत करण्यासाठी वसाहतीचा सुधारित अभिन्यास मुंबई महानगरपालिकेच्या मान्यतेच्या आधीन राहून खालील अटी व शर्तींवर देण्यास मुंबई मंडळापुढे मंजूरीसाठी सादर.

**अटी व शर्ती :-**

अ. सदर प्रकरणी सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत इमारत प्रस्ताव विभागातर्फे आवश्यक त्या सर्व मंजू-या प्राप्त करण्याची जबाबदारी विषयांकित संस्था, विकासक आणि संस्थेच्या वास्तुशास्त्रज्ञावर राहिल.

ब. विषयांकित संस्थेने प्रस्तावासोबत सादर न केलेले कागदपत्र ना हरकत प्रमाणपत्रापुर्वी सादर करणे आवश्यक राहील.

क. संस्थेने सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) मधील नियम (५) अन्वये मुंबई पालिकेच्या संबंधित इमारत प्रस्ताव विभागाकडे अति चटई क्षेत्रफळाच्या अधिमुल्याच्या १२.५ टक्के इतकी (रु.३,७२,७६१/-) रक्कम ऑफसाईट इन्फ्रास्ट्रक्चर फी मुंबई मंडळाच्या ना हरकत प्रमाणपत्रापुर्वी भरणा करणे आवश्यक राहिल.

ड. संस्थेला दि.०२/१२/२००९ रोजीच्या वसुली पत्राद्वारे कळविण्यात आलेल्या फरकाच्या रक्कमेचा भरणा व्याजासह भरणा करुन पावतीची प्रत या कार्यालयाकडे सादर केल्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

ई. प्राधिकरण ठराव क्र.६३९७ नुसार दि.०१/०७/२०११ नंतर टि.डी.आर. चे दर निश्चिम करण्यात आलेले नाहीत. याबाबत समिती गठीत करण्यात आली असून, सदर समिती जो टि.डी.आर. दर निश्चित करेल तो दर व रेडीरेकनर दर यापैकी जे दर कमी असेल त्या दर करुन उपरोक्त प्रस्तावास लागू राहिल.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर, ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.